श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालीत
श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय

## वरीष्ठ महाविद्यालय

# वार्षिक अहवाल २०१६—१७

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालीत, श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालयाची पितृसंस्था म्हणून कार्य करते. जिची स्थापना डॉ. पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांनी १९३२ मध्ये केली. संस्था विदर्भभर २९० पेक्षा जास्त महाविद्यालय व विद्यालय चालविते. ज्या माध्यमातून भाऊसाहेबांचे सर्व तळागळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे ध्येय पार पाडले जाते.

महाराष्ट्र राज्य शासनाने सन १९७१—७२ मध्ये मोर्शी या तालुक्याला विज्ञानाच्या शाखेसाठी मान्यता देवून श्री. शिवाजी शिक्षण संस्थेने हे महाविद्यालय सुरू केले. जरी भौतिक स्तरावर महाविद्यालय छोटे असले तरी पण आज आजूबाजूच्या सर्व ग्रामिण स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय म्हणजे दिशादर्शकाचे कार्य पार पाडीत आहे.

पाचव्या दशकामध्ये कार्य करतांना श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी शहरामधील एक महत्वाचे महाविद्यालय म्हणून ओळख स्थापन केली आहे. महाविद्यालय हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठाशी संलग्नीत असून वर्ष २०१२ मध्ये या महाविद्यालयाला नॅक ने 'ब' दर्जा CGPA २.५० ने गौरविले आहे.

महाविद्यालयाच्या सुरूवातीलाच वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, प्राणिशास्त्र, शारिरिक शिक्षण या विषयांसह महाविद्यालयाला सुरूवात झाली होती. पुढे २००७—२००८ मध्ये यु.जी.सी. Water Quality & Soil Testing या पदविका अभ्यासक्रमाला मान्यता दिली. कालांतराने पदवी स्तरासाठी Computer Science व Computer Applicaton या दोन विषयांचाही समावेश करण्यात आला.

**पदवी स्तरासाठी विषयांची निश्चीतता—**

पदवी स्तरासाठी (B.Sc.) साठी खालीलप्रमाणे विषयांचे/ कार्यक्रमाचे विस्तीरीकरण करण्यात आले.

| विषय | एकूण जागा |
|---|---|
| १. गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, | |
| २. रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, | प्रत्येकी ८० जागा |
| ३. संगणकशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, | |

**नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम**

४. आहार तंत्रज्ञान (फुड प्रोसेसिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी)

<u>सत्रारंभ:—</u>

सत्र २०१६—१७ चे सत्र दि.१३/०७/२०१६ ते ११/०७/२०१७ पर्यंत होते. २०१६—१७ पदवीसाठी एकूण विद्यार्थी संख्या ७०८ होती.

विद्यार्थी परिषदेचे गठनः—

मा. कुलगुरू च्या आदेशान्वये, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ प्रतिनिधीच्या निवडीची प्रक्रिया मा. प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३/०२/२०१६ ला संपन्न झाली व संकेत मोरे यांची विद्यापीठ प्रतिनिधि म्हणून निवड झाली.

## महाविद्यालयाचे उपक्रम

### श्री. आर. आर. लाहोटी मोर्शी येथे खादी दिवस

मा. पंतप्रधान यांच्या खादी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन म्हणून मा. प्राचार्यांच्या आदेशानुसार सर्व कर्मचारी वर्ग प्रत्येक शनिवारी खादी घालण्यास प्रोत्साहन देतील व सोबतच स्वत; ही खादीचे कपडे परिधान करून येतील व दुसरे म्हणजे मोर्शीतील सर्व कर्मचारी दर शनिवारला घरून कोणतीही पेट्रोल व डिझेलच्या वाहनाशिवाय महाविद्यालयात येतील तर अमरावतीचे कर्मचारी शक्यतोवर आपल्या व्यक्तीगत वाहनाने न येता सार्वजनिक वाहनांचा उपयोग करतील. म्हणजेच कोरडा दिवस पाळतील.

### वाचन प्रेरणा दिन

श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी येथे दि. १५.१०. २०१६ रोजी भारताचे दिवंगत माजी मा. डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन कट्टा व वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

आयोजीत वकृत्व स्पर्धेकरिता उद्‌घाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एन. जे. मेश्राम व अध्यक्ष म्हणून डॉ. जी. सी. कांबळे उपस्थीत होते. कार्यक्रमाची सुरूवात डॉ. पंजाबराव उपाख्य भाउसाहेब देशमुख व डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या फाटोचे पूजन व हार्रापण करण्यात आले. यानंतर वकृत्व स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विविध विद्यार्थांना डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम 'एक अष्टपैलू व्यक्तीमत्व ' या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

### रसायनशास्त्र प्रयोगशाळा व वर्गखोली उद्‌घाटन सोहळा

श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी येथे यु.जी.सी.च्या अनुदानातून रसायनशास्त्र प्रयोगशाळा व वर्गखोलीचे उद्‌घाटन प्रसंगी छोटेखानी स्नेहमिलन ऋणानुबंध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. अरूणभाऊ शेळके उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे गणमान्य कार्यकारीनी सदस्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाचे कार्यकारीनी सदस्य व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ, मोर्शी येथील बि.ए. व एम. ए. अभ्यासक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचेही अभिनंदन व स्वागत करण्यात आले. अशा प्रकारे कार्यक्रमाची सांगता झाली.

### संविधान दिनाचे आयोजन

दि. २६/११/२०१६ रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम महाविद्यालयातील शारीरीक शिक्षण विभागातर्फे आयोजित करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम, वरिष्ठ शिक्षक

श्री. तायडे सर, विभाग प्रमुख प्रा. श्री सुगंध बंड व सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व इतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमा पुजनाने झाली त्यानंतर विभाग प्रमुख प्रा. बंड यांनी प्रास्ताविक केले.

## राजमाता जिजाऊ जयंती व युवा दिन महोत्सव

महाविद्यालयामध्ये दि. १२.०१.२०१७ गुरूवार रोजी राजमाता जिजाऊ जयंती व युवा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांनी भुषविले तर प्रमुख वक्ते म्हणून प्राध्यापक श्री. ए.जे. तायडे लाभले. कार्यक्रमाला लाभलेले अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाउसाहेब देशमुख, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन , हारार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला आरंभ करण्यात आला याप्रसंगी बी.ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला भेट म्हणून दिलेल्या राजमाता जिजाऊच्या प्रतिमेचे अनावरण व पूजन करण्यात आले. अध्यक्ष व प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले.

युवा दिनाचे औचित्य साधून ज्या विद्यार्थ्यांनी क्रिडाक्षेत्रात नैपुण्य प्राप्त केले त्यांचा सत्कार घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणामधून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

## शैक्षणिक सहल अहवाल बी. एस्सी.

दिनांक ४/०२/२०१७ रोजी महाविद्यालयातील बी.एस्सी. (गणित) च्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता दि. ४/०२/२०१७ ला सकाळी ८.३० वाजता एकुण ७२ विद्यार्थी तसेच १० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्राचार्यासोबत महामंडळाच्या बसने फन अॅन्ड फुड व्हिलेज करिता प्रस्थान करण्यात आले.

## शैक्षणिक अभ्यास सहल बी.ए. भाग १

महाविद्यालयातील बी.ए. भाग—१ ची शैक्षणिक अभ्यास सहल दि. २१.०१.२०१७ रोज शनिवारला इतिहास विभाग तर्फे सातपुडा पहाडातील अश्मयुगीन गुफांचा अभ्यास करण्यासाठी आयोजीत करण्यात आली होती.

प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजक प्रा. प्रशांत प्र. कोकणे, व प्रा. अर्चना ढोणे यांच्या नियंत्रणाखाली एकूण ३१ विद्यार्थी ठीक ११.०० वाजता चार चाकी वाहनाने महाविद्यालयातून नियोजीत स्थळी पोहचण्यासाठी निघाली आणि ठीक ११.४५ मिनिटांनी सहल नियोजीत स्थळी पोहचली. निमंत्रीत मा. श्री. गजानन कातडे साहेब ( पुरातत्व शास्त्रज्ञ, भारतीय पुरातत्व विभाग , नागपूर ) सोबत उपस्थित झाले होते. सर्व विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली सातपुडा पहाडातील अंबादेवी परिसर 'कुकडसा साइट' हया अश्मयुगीन गुफा भागात पोहचली.

# विभागांचे वार्षिक अहवाल

## रसायनशास्त्र :—

२०१६—२०१७ या सत्रामध्ये डॉ. कु. पी. एम. दहिकर विभाग प्रमुख, श्री. जी.डी. रावते साहायक प्राध्यापक यांनी आपले कार्य पार पाडले. डॉ. एम. एस. लुंगे, व्ही. आर. नेरकर, एस. डी. रानोटकर, कु. एच. ए. होले, कु. एम. एम. निकम या सर्व CHB नी या सत्रामध्ये प्राध्यापकाचे कार्य केले. डॉ. एम. एस. लुंगे यांना आचार्य पदवी प्राप्त झाली आहे.

पदवी अभ्यासक्रमासोबत गुणवत्ता व माती परिक्षण आणि Food Processing & Technology हा विषय यु.जी.सी. व्दारा कार्यन्वीत अभ्यासक्रम चालविण्यात आले.

अध्यापणाकरिता विविध दृक—श्राव साधने L.C.D. , T.V., Power Point Presentation (PPT), Models, Charts यांचा वापर करण्यात आला.

विभागातील डॉ. कु. पी. एम. दहिकर यांनी Academic Staff College. SGBAU व्दारा आयोजित Short Term Course मध्ये सहभाग घेतला. डॉ. कु. पी. एम. दहिकर यांनी राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला. श्री. जी.डी. रावते यांनी एक राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.

कु. ज्योत्स्ना बर्डे B.Sc. III या विद्यार्थीनीने आंतरमहाविद्यालयीन Seminar Competition मध्ये सहभाग घेतला. तसेच कु. निंभोरकर हीने आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत सहभाग घेतला.

डॉ. कु. पी.एम. दहिकर व श्री. जी.डी. रावते यांनी एक यु.जी.सी. चा लघु संशोधन प्रकल्प पुर्ण केला आहे.

डॉ. कु. पी.एम. दहिकर<br>
विभाग प्रमुख<br>
रसायनशास्त्र विभाग

## प्राणिशास्त्र विभाग :—

प्राणिशास्त्र विभागामध्ये सत्र २०१६—१७ मध्ये बी.एस.सी. भाग १ मध्ये ८३, बी.एस.सी. भाग २ मध्ये ६३, विद्यार्थी व बी.एस.सी. भाग ३ मध्ये ३० विद्यार्थी प्रवेशीत होते.

प्राणिशास्त्र विभागामध्ये डॉ. ए.के. सोळंके हे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे. या शिवाय कु. करिश्मा खेरडे व कु. एस. पी. पाबळे तासिका तत्वावर शिक्षिका म्हणून सेवेत आहे.

प्राणिशास्त्र विभागात ' प्राणिशास्त्र सोसायटी' २०१६—'१७ स्थापन करण्यात आली. रत्नाकर मोरे यांची सोसायटीच्या अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सोसायटी